पुण्यनगरी पा. ११.३०

# बंडखोर गटाच्या ४१ आमदारांसह १० खासदारांना वाय प्लस सुरक्षा

**। मुंबई :** महाविकास आघाडीच्या बड्या नेत्यांचे संरक्षण काढून घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता शिंदे-फडणवीस सरकारने समर्थक ४१ आमदार आणि दहा खासदारांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांची सुरक्षा वाय प्लस दर्जाची वाढवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मंत्रालयातील अधिकारी सूत्रांनी दिली.

सूत्रांच्या माहितीनुसार, मागील शुक्रवारी महाविकास आघाडीच्या महत्त्वाच्या नेत्यांची सुरक्षा काढून घेण्यात आल्यानंतर आता शिंदे-फडणवीस सरकारने आपल्या समर्थक ४१ आमदारांसह १० खासदारांना तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाय प्लस सुरक्षेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. राज्यात अंबानी कुटुंबीयांसह मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि राज्यपालांना झेड प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे त्यांच्या पत्नी रश्मी तसेच मुलगा तेजस यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांनाही वाय प्लस दर्जाची सुरक्षा आता देण्यात आली आहे. याशिवाय रामटेकचे शिंदे समर्थक खासदार कृपाल तुमाने यांच्या सुरक्षेतही वाढ करण्यात आली आहे. परमवीर सिंग आरोप प्रकरणातील निवृत्त न्यायाधीश के. एच. चांदिवाल यांची सुरक्षा कमी करण्यात आली असून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अभिनेता सलमान खान यांना वाय प्लस सुरक्षा देण्यात आली आहे.

पुण्यनगरी पृ. पा. ४०

# विनापरवानगी इंटरनेट टॉवर पालिकेच्यां रडारवर

**। मीरा रोड ।** मीरा-भाईंदर शहरात सुयोग टेलिमॅटिक्स या खासगी कंपनीने महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता शहरात व्यावसायिक इंटरनेट टॉवर लावले असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या विना परवानगी टॉवरवर कारवाई करण्याचे आदेश महापालिका प्रशासनाने दिले आहेत. या बेकायदा टॉवरमुळे महापालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला आहे. मीरा-भाईंदर शहरात सुयोग टेलिमॅटिक्स या खासगी कंपनीने काही महिन्यांपूर्वी शहरात ठिकठिकाणी विनामूल्य सीसीटीव्ही बसवून देण्याचा प्रस्ताव महापालिकेला दिला होता.

ही कंपनी मोफत सीसीटीव्ही लावून देणार असली तरी यामध्ये कंपनीचा काय फायदा आहे, याची महापालिका प्रशासनाने विचारणा केली असता ही कंपनी सीसीटीव्ही टॉवरवर इंटरनेट बुस्टर लावणार असल्याची माहिती मिळाली. टेलिकॉम कंपनी व्यावसायिकदृष्ट्या याचा वापर करणार असल्यामुळे या व्यवसायातून कंपनीला होणाऱ्या फायद्यातून किती फायदा महापालिकेला देणार, याचा फेरप्रस्ताव सादर करण्याचे महापालिकेने या टेलिकॉम

## महापालिकेचे कारवाईचे आदेश

कंपनीला उत्तर दिले; परंतु त्यानंतर या कंपनीने महापालिकेकडे कोणताही पत्रव्यवहार केला नाही व जे प्रस्ताव सादर करण्याचे पत्र कंपनीला दिले होते. त्याचा गैरवापर करत पोलीस प्रशासनाची मोफत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे सांगत परवानगी मिळवली.

महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता शहरात विविध ४४ ठिकाणी इंटरनेट बूस्टर बसवण्यात आल्याचे महापालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. हे



टॉवर महापालिकेकडे सीसीटीव्ही लावण्याचा प्रस्ताव दिलेल्या कंपनीनेच उभारले असल्याचे आढळून आले.

ही टेलिकॉम कंपनी जिओ व इतर मोबाईल कंपन्यांचे इंटरनेट बूस्ट करून देत असून त्या बदल्यात त्या मोबाईल कंपन्यांकडून शुल्क घेत असल्याचे दिसून आले. या विना परवानगी लावण्यात आलेल्या इंटरनेट बूस्टर टॉवरमुळे मोबाईल कंपनीला इंटरनेट बूस्ट करण्यासाठी स्वतंत्र टॉवर उभारण्याची व त्यासाठी महापालिकेला भाडे भरण्याची आवश्यकता लागत नाही; परंतु यामध्ये महापालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

त्यामुळे महापालिका प्रशासनाने या बेकायदा टॉवरवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

> “ या टेलिकॉम कंपनीला महापालिकेने फेरप्रस्ताव सादर करण्याचे दिलेले पत्र महापालिकेची परवानगी असल्याचे दाखवून टेलिकॉम कंपनीने पोलीस परवानगी व वीज जोडणी देखील मिळवली आहे. या कंपनीने विना परवानगी लावलेल्या इंटरनेट बूस्टर टॉवरवर कारवाई करण्याचे आदेश प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात येणार आहेत. तसेच वीज कंपनीलाही वीजपुरवठा खंडित करण्याचे पत्र देण्यात येणार आहे. तसेच आवश्यकता भासल्यास कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत लावण्यात आलेल्या टॉवरची शास्तीसह वसुली करण्यात येणार आहे.
>
> **- संजय शिंदे (उपायुक्त, मीरा-भाईंदर महापालिका)**

पुण्यनगरी पा.नं.५.

# पोलीस स्टेशन आणि निवासस्थान बांधकामांसाठी आवश्यक निधी देणार

**मुंबई** : राज्यातील पोलीस स्टेशन आणि पोलीस निवासस्थानांची कामे ही प्राथमिकता असून, ती कामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाला दिले आहेत. या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



मंत्रालयात मंगळवारी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस गृहनिर्माणसंदर्भात महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची आढावा बैठक झाली. अपर मुख्य सचिव (गृह) आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी आदींसह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. यावेळी फडणवीस म्हणाले, सुरुवातीच्या टप्प्यात अत्यावश्यक असलेली कामे हाती घ्या. ती वेळेवर आणि गतीने पूर्ण होतील, यासाठी प्राधान्य द्या. पोलीस स्टेशनच्या ठिकाणीच पोलीस निवासस्थानांसाठी जागा उपलब्ध असेल, तर तिथेच ती बांधली जावीत. त्या जागेचा पुरेपूर उपयोग पोलिसांसाठी होईल, अशा पद्धतीने आराखडा तयार करण्याची सूचना त्यांनी केली. सध्या राज्यातील पोलीस स्टेशन आणि पोलीस निवासस्थानांची कामे प्रगतीपथावर आहेत.

यातील १५ प्रकल्पांचे लवकरच हस्तांतरण होणार आहे. तर १० प्रकल्प आगामी सहा महिन्यांत पूर्ण होतील. उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामांची गती वाढवा, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी महामंडळाला दिले. वरळी येथील पोलीस वसाहतीच्या पुनर्विकास कामांना गती देण्यात यावी. या ठिकाणी मार्केट ॲनालिसीस करण्यात आलेले आहे. महत्त्वाच्या जागेवर असणारा हा प्रकल्प वेळेवर पूर्ण होणे आवश्यक असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. इमारतीबरोबर परिसरही स्वच्छ ठेवावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

## कामे वेळेवर आणि दर्जेदार करा

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने प्राधान्यक्रमानुसार ज्या कामांची यादी तयार केली आहे, ती पुन्हा एकदा तपासून सादर करावी. कामे वेळेवर आणि दर्जेदार व्हावीत, याकडे लक्ष द्यावे. याबरोबरच पाच वर्ष पूर्ण झालेल्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती महामंडळाने स्वतःकडे घ्यावी. त्यासाठी एखादी यंत्रणा आऊटसोर्सिंगद्वारे नेमून त्याचे सनियंत्रण महामंडळाने करावे आणि या इमारतींची देखभाल व दुरुस्ती तातडीने व्हावी, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

## कारागृह निर्मितीचा विचार करा

मुंबईमध्ये आता नव्या कारागृहाची गरज आहे. त्यासाठी किमान १० एकर जागेची आवश्यकता आहे. महामंडळाने यासदर्भात जागेची निश्चिती करून कारागृह निर्मितीचा विचार करावा. याशिवाय, नागपूर आणि पुणे येथेही कारागृहाची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. नागपूर येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

पुण्यनगरी पु.पा.४०

# मीरा-भाईंदरमध्ये वारकरी भवनाचे इंदुरीकर महाराजांच्या हस्ते होणार भूमिपूजन

**मीरा रोड** : मीरा-भाईंदरमध्ये महाराष्ट्रातील पहिले आगळे वेगळे व भव्य असे वारकरी भवनाचे भूमिपूजन ३ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांच्या हस्ते होणार आहे. या आगळ्यावेगळ्या वास्तूमुळे मीरा-भाईंदर शहराच्या सांस्कृतिक वैभवात आणि शहराच्या नावलौकिकात भर पडणार आहे. मीरा-भाईंदरमध्ये वारकरी संप्रदायाला मानणारे लोक मोठ्या प्रमाणात असून, गेले अनेक वर्षे 'वारकरी भवन' शहरात मंजूर व्हावे, अशी श्री नारायणगड सेवा भावी संस्थेची मागणी होती. ही मागणी आ. प्रताप सरनाईक यांनी मान्य केली असून, त्यांच्या संकल्पनेतून वारकरी भवनासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे.

काशिमीरा येथे मान डेव्हलपर्सच्या सुविधा भूखंडावर हे वारकरी भवन उभे राहणार असून, तळ अधिक पहिला मजला असे त्याचे स्वरूप असणार आहे. या कामासाठी राज्य सरकारकडून २ कोटी रुपये निधी खर्च करून हे वारकरी भवन पुढील १ वर्षात बांधून तयार केले जाणार आहे. या वारकरी भवनाचे भूमिपूजन ३ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता इंदुरीकर महाराजांच्या हस्ते होणार असून, त्यानंतर भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृहात इंदुरीकर महाराज यांचे समाज प्रबोधनपर कीर्तन होणार आहे. इंदुरीकर महाराज हे कीर्तनासाठी खूप प्रसिद्ध असून, त्यांच्या हस्ते भूमिपूजन होणार असल्याने या कार्यक्रमाला मोठी गर्दी होणार आहे. टाळ-मृदुंग आणि हरिनामाच्या गजरात हे भूमिपूजन पार पडणार आहे. मीरा-भाईंदर शहरातील वारकरी संप्रदायातील सर्व वारकरी, भजनी मंडळी, कीर्तनकार, भक्तिमार्गातील नागरिक मोठ्या संख्येने या भूमिपूजन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. वारकरी भवनाची वास्तू तयार झाल्यानंतर वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांना हक्काची एक जागा मिळणार आहे. भजन, कीर्तन, धार्मिक सोहळे, वार्षिक धार्मिक कार्यक्रम यासाठी येथे सभागृह उपलब्ध होईल. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत साहित्य, वारकरी संप्रदाय याबाबत येथे नवीन तरुणांना मार्गदर्शन मिळेल. अनेक नवीन कीर्तनकार, प्रवचनकार तयार होण्यासाठी या वारकरी भवनातून त्यांना आवश्यक ते सहकार्य दिशा मार्गदर्शन मिळणार आहे. या वारकरी भवनात कीर्तनकार, प्रवचनकार व संत साहित्याची ज्यांना माहिती हवी आहे त्यांच्यासाठी संत साहित्याचे ग्रंथालय तयार करण्यात येणार आहे. अध्यात्मिक अभ्यास करणाऱ्यांसाठी या ग्रंथालयाचा उपयोग होईल. तरुण पिढीला आध्यात्मिक ग्रंथांची नीटपणे ओळख त्यामुळे होऊ शकेल. वारकरी भवनाची संकल्पना नवीन पिढीला मार्गदर्शक ठरेल. तसेच कीर्तनकार, प्रवचनकार शहरात कीर्तन-प्रवचनासाठी आल्यास त्यांच्या राहण्यासाठी विश्राम व्यवस्था भवनात केली जाणार असल्याचे आ. सरनाईक यांनी सांगितले.

पुढारी फु.पा.२.

# विरार रेल्वेस्थानक परिसर फेरीवालामुक्त कधी होणार?

**विरार : पुढारी वृत्तसेवा**



विरार पश्चिमेच्या इमारतींच्या दाटीवाटीतून जाणारा विरार-आगाशी रस्ता रेल्वे स्थानकालगत डोंगरपाड्याकडे जाणारा अण्णासाहेब वर्तक रोड, विरार गावठण रोड, एसटी स्टॅन्डकडे विरार रेल्वे स्थानकाकडून जाणारा हे सर्व रस्ते वाहतुकीने गच्च भरलेले असतात. विरार रेल्वे स्थानकाच्या मुख्य रस्त्यावर स्कायवॉक रहदारीसाठी बांधण्यात आला आहे. मात्र त्याचा वापर होत नाही. स्टेशनमधून बाहेर पडणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी रिक्षा रस्ता वेढून उभ्या असतात. फळे, फुले व भाजी विक्रेते यांनी संपूर्ण रस्ता असा काही अडविला आहे की, या रस्त्यावर पादचाऱ्यांना चालताच येत नाही. येथील अरुंद रस्त्यावर प्रवासी रिक्षा मोठ्या प्रमाणात असल्या तरी त्यांची रस्ते अडवून संथ वाहतूक होत असते.

काही फेरीवाले वर्षानुवर्षे जागा अडवून बसले आहेत. मात्र ते कोणाला घाबरत का नाहीत. त्यांचे बेकायदा धंदा करण्यासाठी कोण गॉड फादर आहेत? रिक्षा चालकांचीही तीच गत. हे रिक्षाचालक संपूर्ण रस्ता अडवितात, वाहतूक कोंडीत भर घालतात. अण्णासाहेब वर्तक मार्गावरचे सर्व रिक्षाचालक भर बाजारात दुकानांसमोर रेल्वे स्थानकासमोर अरुंद रस्त्यावर तासनतास रिक्षा लावतात. तर काही रिक्षाचालक रेल्वे स्थानकाच्या कंपाऊंड बाहेर भर रस्त्यात प्रवाशांसाठी रिक्षा थांबवून उभ्या असतात.

वाहतूक पोलीस असून नसल्यासारखे तर आरटीओ, महानगरपालिका व वाहतूक पोलिस यंत्रणा यांना या परिस्थितीशी देणे-घेणे नसल्याचा आरोप प्रवाशांमधून होत आहे. या मुख्य रस्त्यावर बाजारपेठ, वाहतुकीची गर्दी व पादचाऱ्यांची वर्दळ असली तरी लोकांची रेल्वे स्थानकावर येण्या-जाण्याची मोठी गैरसोय होते. विरार पश्चिमेला पेट्रोल पंपापर्यंत रस्ते गजबजलेले असतात. डॉक्टरकडे जाणारे, हॉस्पिटलला जाणारे, ज्येष्ठ नागरिक, अपंग व आजारी रुग्ण यांना या रस्त्यावर चालणे मुश्किल होतेच मात्र महिला व लहान मुलांना मार्ग काढणे अवघड होते.

### कारवाईची मागणी

पालिकेने व प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने महापालिकेच्या मदतीने कठोर कारवाई करुन एक दिशा मार्ग रस्ता करुन रेल्वे स्थानकालगत फेरीवाले व रिक्षा चालकांना दिडशे मीटर रेल्वे स्थानकापासून दूर हटवावे व उच्च न्यायालयाच्या सूचनांचे पालन करावे, अशी मागणी विरार मित्र मंडळाने केली आहे.

लोकमत फु.पा.३.

# ऑनलाइन फसवणुकीचे ९४ गुन्हे उघड

## दोन वर्षांत २६० गुन्हे दाखल; १४८ आरोपींना शिक्षा


लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दोन वर्षांत २६० गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील ९४ गुन्हे उघडकीस आणून त्यातील १४८ आरोपींना अटक केली आहे. भाईंदर, नवघर, काशिमीरा, मीरा रोड, वालीव, विरार, वसई या सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सर्वाधिक ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

१ ऑक्टोबर २०२० ते १ ऑक्टोबर २०२२ या दोन वर्षांत २६० गुन्हे दाखल झाले होते. यात अटक झालेल्या आरोपींना न्यायालयाने शिक्षाही सुनावली आहे. ऑनलाइन फसवणुकीत ऑनलाइन ओटीपीच्या माध्यमातून बँक खाते आणि क्रेडिट कार्डमधून पैसे काढण्याचे सर्वाधिक प्रकार घडतात. यात मदत करण्याच्या बहाण्याने ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक लक्ष्य केले जाते. मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या मार्गदर्शनाखाली ५० टक्के फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. १ ऑक्टोबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२१ या काळात फसवणुकीचे १२८ गुन्हे दाखल होते, तर त्यापैकी ५१ गुन्हे उघडकीस आणले असून १०५ आरोपींना अटक करण्यात आली.

### फसवणुकीचे १३२ गुन्हे

१ जानेवारी ते १ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत फसवणुकीचे १३२ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी ४३ गुन्हे उघडकीस आणून ४३ आरोपींना अटक केली आहे. ऑनलाइन व्यवहार करताना पूर्ण खात्री करावी. फसवणूक झालीच तर तातडीने स्थानिक पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार द्यावी व बँकेचे खाते बंद करावे, असे आवाहन पोलीस आयुक्तालयाने केले आहे.



सकाळ पु. पा. १०

काळी बांधवांचे साइबाबाच्या चरणा साकड

# वाढवण बंदर प्रकल्प रद्द करण्याची बुद्धी सरकारला दे!

वसई, ता. १ (बातमीदार) : पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे होणाऱ्या वाढवण बंदराला प्रखरपणे नागरिकांकडून विरोध केला जात आहे. सरकारलादेखील इशारा देण्यात आला आहे; मात्र सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा करून सरकार जागे होत नाही. यामुळे कोळी बांधवांनी थेट शिर्डी गाठत साईंच्या दरबारी वाढवण बंदर रद्द करा, असे साकडे घालून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

डहाणू येथील वाढवण बंदराला प्रखर विरोध दर्शविण्यात येत आहे. पालघर, सातपाटी, नायगाव, अर्नाळा, डहाणूसह संपूर्ण पालघरमध्ये या बंदराविरोधात आंदोलन करण्यात येत आहे. अशातच आता सरकार नागरिकांच्या बाजूने भूमिका घेत नसल्याने अर्नाळा येथील कोळी बांधवांनी थेट दुचाकीवरून शिर्डी गाठली व साईचरणी वाढवण बंदर रद्द करा, असे साकडे घातले.



वसई : शिर्डीमध्ये कोळीबांधवांनी वाढवण बंदराबाबत साईंना साकडे घातले.

गेली २६ वर्षे वाढवण बंदराविरोधात ग्रामस्थांचा लढा सुरू आहे. याबाबत आतापर्यंत सरकारकडे अनेक पत्रव्यवहार करण्यात आले. आंदोलने झाली, बैठकादेखील घेण्यात आल्या; पण केंद्र सरकारच्या या प्रकल्पाला रोखण्यास राज्यातील सरकार अपयशी ठरले. त्यामुळे ग्रामस्थांनी भूमिपुत्रांना उद्ध्वस्त करणारे वाढवण बंदर रद्द होवो, सरकारला यासाठी बुद्धी दे, अशी प्रार्थना करून साईंना साकडे घातल्याने सरकार आता तरी ग्रामस्थांच्या बाजूने उभे राहील का, अशी प्रतीक्षा नागरिक करत आहेत.

ज्या वेळी सगळे पर्याय संपतात तेव्हा ईश्वर आठवतो. वाढवण बंदराचे अरिष्ट दूर व्हावे म्हणून साईबाबांना साकडे घालण्यात आले आहे.
- देवानंद म्हात्रे, ग्रामस्थ, अर्नाळा

### पारंपरिक पेहराव

अर्नाळ्यातील ओम ओम साई सेवा मंडळाची अर्नाळा ते शिर्डी दुचाकी यात्रेचे देवानंद म्हात्रे यांनी आयोजन केले. यावेळी 'एकच जिद्द वाढवण बंदर रद्द' ही घोषणा करण्यात आली. या वेळी कोळी बांधवांनी पारंपरिक पेहराव केला होता.

लोकसत्ता पु. प. १.

## नशामुक्ती शाळेत एका वर्षात ४ हजार तरुणांचे समुपदेशन

# वसईत तरुणांच्या व्यसनमुक्तीसाठी पोलिसांचा पुढाकार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** व्यसनाधीन तरुणांचे प्रमाण कमी करण्यासाठी तुळींज पोलिसांनी सुरू केलेल्या नशामुक्ती शाळेत एका वर्षात ४ हजार तरुणांचे समुपदेशन करण्यात आले. त्यातील १४ जणांना पुनर्वसन केंद्रात दाखल केले आहे. शाळेमुळे गुन्हेगारीलादेखील आळा बसला आहे.

शहरातील विविध गुन्ह्यांचा अभ्यास करताना बहुतांश आरोपी हे अमली पदार्थांचे सेवन करत असलेले आढळून आले आहेत. या गुन्हेगारीचे मूळ असलेल्या अमली पदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करणे तसेच या व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांना योग्य मार्गावर आणण्यासाठी त्यांचे समुपेदशन करण्याचा निर्णय नालासोपारामधील तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी घेतला होता. त्यानुसार दररोज संध्याकाळी नशामुक्ती शाळा सुरू करण्यात आली. पुनरुज्जीवन या सामाजिक संस्थेमार्फत ही शाळा चालविण्यात येते. पोलीस अधिकारीदेखील या तरुणांना मार्गदर्शन करतात. वर्षभरात चार हजार तरुणांचे समुपदेशन करण्यात आले. त्यातील १४ मुलांना पुनर्वसन केंद्रात दाखल करण्यात आले. बहुतांश तरुणांचा खर्च पोलिसांनी उचलला आहे. समुपदेशामुळे अनेक मुले चांगल्या मार्गाला लागल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांबळे यांनी सांगितले. मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात एकूण १७ पोलीस ठाणी आहेत. मात्र केवळ तुळींज पोलीस ठाण्यातच ही अनोखी संकल्पना असलेली नशामुक्ती शाळा सुरू आहे.

### अमली पदार्थांविरोधात सर्वाधिक कारवाई

एकीकडे नशेच्या आहारी गेलेल्या तरुणांना योग्य मार्गावर आणण्याचे काम सुरू असताना दुसरीकडे अमली पदार्थांविरोधात जोरदार कारवाई सुरू करण्यात आली आहे. २०१५ ते २०२० या पाच वर्षांत तुळींज पोलीस ठाण्यात अमली पदार्थांविरोधात केवळ ९५ गुन्हे दाखल होते. मात्र चालू वर्षातील १० महिन्यांतच १८५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. गुन्हेगार पकडण्याबरोबर गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांबळे यांनी सांगितले.

### गुन्हेगारीला आळा



पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अमली पदार्थांविरोधात कारवाई केल्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. विविध गुन्ह्यांचे प्रमाण कमी झाले आहे. शिवाय गंभीर गुन्ह्यांनाही आळा बसला आहे. मागील वर्षी तुळींज पोलीस ठाण्यात १७ हत्या घडल्या होत्या. या वर्षी केवळ एका हत्येचा गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

लोकसत्ता पु. पा. १.

# उपचारात अर्भकाचा हात गमावला

## डॉक्टरांवर बेफिकिरीचा पालकांकडून आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** नालोसापारा येथील एका नवजात बालकावर उपचार करताना त्याचा हात गमावल्याची घटना घडली आहे. डॉक्टरांच्या बेफिकिरीमुळे ही घटना घडली असून संबंधित डॉक्टरांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी बाळाच्या पालकांनी केली आहे.

नालासोपारा येथे राहणाऱ्या अंजली वाला हिने नालासोपारा येथील त्रिवेणी या खासगी रुग्णालयात ५ ऑक्टोबरला जुळ्या मुलांना जन्म दिला होता. यातील एका बाळाची शुगर कमी असल्याचे सांगून डॉक्टरांनी सलाईन लावले. मात्र त्या सलाईनमुळे त्याचा उजवा हात काळा पडत गेला. मालीश केल्यावर ठिक होईल असे त्यांनी सांगितले. पण बाळाच्या तब्येतीत काहीच सुधारणा होत नसल्याने पालकांनी त्याला मुंबईच्या वाडिया रुग्णालयात नेले. यावेळी बाळाच्या हाताला गँगरिन झाल्याने बाळाचा हात कापण्यात आला. माझ्या बाळाची प्रकृती चांगली होती. डॉक्टरांनी बाळाला चुकीच्या पध्दतीने सलाईन लावले आणि त्यामुळे बाळाचा हात कापावा लागला असा आरोप अंजली वाला यांनी केला. या प्रकरणी पालकांनी पोलीस ठाणे, महापालिका आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत

या संदर्भात लवकरात लवकर चौकशी करून अहवाल सादर केला जाईल, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक अधिकारी डॉक्टर संजय बोदाडे यांनी दिली. या प्रकरणात जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अहवाल आल्यानंतर नियमानुसार कारवाई केली जाईल, अशी माहिती नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी दिली. चुकीच्या उपचारांचा आरोप रुग्णालयाने फेटाळला आहे. बाळावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते, पण पालकांनी त्याला इतर रुग्णालयात नेले. त्यामुळे तेथे काय झाले सांगता येणार नसल्याचे रुग्णालयाचे वरिष्ठ डॉ. अतुल पारसकर यांनी सांगितले.

लोकसत्ता पु-पा-१.

# जेट्टीविना अर्नाळा किल्लावासीयांची परवड कायम

## पाच वर्षांपासून सागरी मंडळाकडून जेट्टीचे काम सुरूच

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** विरारच्या अर्नाळा समुद्रातील जेट्टीचे काम रखडल्याने गावात राहणाऱ्या नागरिकांची बोटीतून प्रवास करताना परवड होत आहे. पाच वर्षांपूर्वी महाराष्ट्र सागरी मंडळाकडून या जेट्टीचे काम सुरू करण्यात आले होते, मात्र अद्यापही ते पूर्ण झालेले नाही.

विरार पश्चिमेच्या भागात अर्नाळा किल्ला परिसर आहे. हा परिसर बेटावर असल्याने या भागातील नागरिकांना बोटीतून प्रवास करावा लागत आहे.



**“जेट्टीचे काम सुरू होऊन चार ते पाच वर्षे झाली तरीही हे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे अर्नाळा किल्ल्यात राहणाऱ्या नागरिकांना पाण्यातून ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागतो. या समस्या लक्षात घेऊन लवकर जेट्टी तयार करून नागरिकांना दिलासा द्यावा.**

- निनाद पाटील, सामाजिक कार्यकर्ते

किनाऱ्यावर जेट्टी नसल्याने भागातील नागरिकांना गुडघाभर पाण्यातच बोट थांबवून त्याठिकाणी उतरून प्रवास करावा लागतो. हा अडचणीच्या व धोकादायक प्रवासातून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी या भागात मेरिटाइम बोर्डाने जेट्टी तयार करण्याचे काम हाती घेतली आहे. यासाठी आराखडा तयार केला होता. २०१७ पासून हे काम सुरू आहे. यासाठी अर्नाळा किनाऱ्यावरून सुमारे १६ कोटी व अर्नाळा किल्ल्याच्या बाजूने १० कोटी असा निधीही मंजूर करण्यात आला होता. २०१९ मध्ये जेट्टीचे काम पूर्ण होईल असे सांगण्यात आले होते. काम सुरू होऊन जवळपास पाच वर्षांचा कालावधी उलटून गेला तरीही जेट्टीचे काम पूर्ण झाले नाही. आजही येथील नागरिकांना गुडघाभर पाण्यातून चालत जाऊन बोटीतून चढ-उतार करून धोकादायक प्रवास करावा लागत असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले आहे. विशेषकरून महिला, शाळकरी मुळे, वयोवृद्ध नागरिक यांना अडचणी येतात. ज्या वेळेस समुद्राला भरती असते, त्या वेळेस आणखीन अडचणी वाढतात. त्यामुळे जेट्टीचे काम लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

लोकसत्ता पु-पा-१.

# दूरध्वनीद्वारे मतदार ओळखपत्र आधार कार्डला जोडण्यास विरोध

## अनोळखी क्रमांकामुळे नागरिक संभ्रमात

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**


**वसई :** केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत मतदार ओळखपत्राला आधार जोडणी (लिंक) करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी पालिकेने दोनशेहून अधिक मतदानस्तरीय केंद्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मात्र हे अधिकारी नागरिकांना थेट फोन करून त्यांचा आधार कार्ड मागत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. ऑनलाइन फसवणुकीचे गुन्हे वाढत असताना फोनवरील अनोळखी व्यक्तीला आमचा आधार क्रमांक का द्यावा, असा सवाल नागरिकांनी केला आहे.

दुबार नावे असणे, पत्ता अपूर्ण असण्यासारखे दोष मतदार यादीमध्ये आढळून येतात. या पार्श्वभूमीवर मतदार ओळखपत्राला आधार लिंक करण्याची मोहीम राबविण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाद्वारे ही मोहीम राबविण्यात येणार आहे. विशेष शिबिराच्या माध्यमातून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फतही घरोघरी भेटी देऊन माहिती संकलित करण्यात येणार आहे. वसई विरार पालिकेने त्यासाठी दोनशेहून अधिक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मात्र ते नागरिकांना थेट फोन करून त्यांचा आधार कार्ड क्रमांक मागत आहे. संबंधित व्यक्ती पालिकेतील मतदान प्रक्रियेशी संबंधित कर्मचारी आहे का त्याची माहिती नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सध्या ऑनलाइन फसवणुकीचे गुन्हे वाढत आहे. त्यामुळे फोन करणारा व्यक्ती खरा की खोटा याची माहिती नाही, असे वसईत राहणाऱ्या किंजल पटेल यांनी सांगितले. मतदार ओळखपत्र आधार कार्डाला जोडण्याची प्रक्रिया राबविण्यासाठी आम्ही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी नागरिकांच्या घरी जाणे अपेक्षित आहे. फोनवरून थेट आधार कार्ड क्रमांक मागितला तर नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो असे पालिकेचे उपायुक्त (आस्थापना) दीपक कुरुळकर यांनी सांगितले. २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी ही मोहीम पूर्ण करण्याचा निवडणूक आयोगाचा प्रयत्न आहे. त्यासाठी मतदारांनी फॉर्म-६ ब भरून द्यावा, असे आवाहन पालिकेने केले आहे. मतदार याद्या अधिकाधिक निर्दोष करण्यासाठी ही मोहीम असली तरी ती ऐच्छिक असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याबाबत https://nvsp.in किंवा https://ceo.maharashtra.gov.in या आयोगाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.

लोकसत्ता ५-५-१०

# विरारच्या फुलपाडा स्मशानभूमीची दुरवस्था

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई:** विरारच्या फुलपाडा येथे अंत्यसंस्कार करण्यासाठी तयार केलेल्या स्मशानभूमीत सोयीसुविधा व देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे.


विरारच्या फुलपाडा येथे अंत्यसंस्कार करण्यासाठी पालिकेने स्मशानभूमी तयार केली आहे. या स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नागरिकांना आवश्यक असलेल्या सोयीसुविधा उपलब्ध होत नाहीत. लाकडे उपलब्ध नसणे, वाढलेली अस्वच्छता, दफनाच्या जागेतील वाढलेली झाडी, पावसाळ्यामुळे वाढलेले गवत, या समस्यांसह पाण्याचा अभाव, स्वच्छतागृह, अंत्यविधी करण्याची योग्य जागा आदी सुविधा येथे दिसत नाहीत. स्मशानभूमी तयार करण्यासाठी पालिका कोट्यवधी रुपये खर्च करते, मात्र त्याची देखभाल दुरुस्ती योग्य होत नाही असे माजी नगरसेवक सुदेश चौधरी यांनी सांगितले. विरार पश्चिम व वसई येथील वासळई तसेच नाळे व आगाशी त्या ठिकाणच्या असलेल्या स्मशानभूमीची अवस्थादेखील अशीच दयनीय आहे. ज्या ठिकाणी आवश्यक सोयीसुविधा नाहीत तेथे त्या उपलब्ध करून द्याव्यात, तसेच त्याची देखभाल करण्यात यावी, अशी मागणी चौधरी यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्याकडे केली आहे.

लोकसत्ता ५-५-१०

# नाट्यगृह, नवीन मुख्यालयाच्या कामाची रखडपट्टी

## राजकीय श्रेयासाठी काम लांबणीवर टाकत असल्याचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**वसई :** निवडणुका लांबणीवर पडल्याने विविध विकासकामेदेखील संथगतीने सुरू आहेत. श्रेय घेण्यासाठी हेतुपूरस्सर ही कामे पूर्ण करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

मागील अडीच वर्षांपासून वसई-विरार महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक झालेली नाही. पालिकेत प्रशासकीय राजवट असून सर्व कामे प्रशासनामार्फत केली जात आहे. मात्र अनेक विकासकामे आणि प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. पालिकेचे नवीन मुख्यालय विरार पश्चिमेच्या विराट नगर येथे तयार करण्यात आले आहे. दिवाळीत तेथे जुने मुख्यालय स्थलांतरित केले जाणार होते. नालासोपारा पूर्वेच्या मजिठिया येथे पालिकेचे नाट्यगृहाचे अंतिम टप्प्यातील कामदेखील पूर्ण झालेले नाही. आता उद्घाटन झाले तर प्रशासनातील अधिकारी आणि स्थानिक आमदारांच्या नावांच्या पाट्या येतील. नगरसेवक, महापौर आणि इतर पदाधिकाऱ्यांची नावे येणार नाहीत. म्हणून ही कामे हेतुपुरस्सर अर्धवट ठेवून त्यांची उद्घाटने लांबवली जात असल्याचा आरोप भाजपचे नेते मनोज पाटील यांनी केला आहे.


रंगमंच तयार असताना तो खुला न केल्याने दिवाळी पहाटसारखा सांस्कृतिक कार्यक्रम खासगी शाळेत घ्यावा लागला असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, ही सर्व कामे अंतिम टप्प्यात असून लवकरच ती पूर्ण केली जातील, अशी माहिती पालिकेच्या बांधकाम विभागाने दिली.

लोकसत्ता ५.५.१७.

# वर्षभरात वैतरणा जेट्टीची नासधूस

## बांधकामात पायऱ्या आणि टप्प्यांचा अभाव; अपघाताचा धोका

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई:** वर्षभरापूर्वी तयार करण्यात आलेल्या वैतरणा जेट्टीची नासधूस होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. याशिवाय जेट्टी तयार करताना वैतरणा व वाढीव येथील दोन्ही जेटींना पायऱ्या, टप्पे बांधणे आवश्यक असताना ते बांधण्यात न आल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

विरार जवळील भागात वैतरणा वाढीव परिसर आहे. या भागात ये-जा करण्यासाठी सुरुवातीला केवळ रेल्वे मार्ग हा एकमेव मार्ग असल्याने रेल्वेपुलावरून धोकादायक प्रवास करावा लागत होता. यामुळे अनेकदा अपघाताच्या घटनाही घडल्या आहेत. या घटना रोखण्यासाठी वैतरणा व वाढीव अशा दोन्ही ठिकाणी मेरी टाइम बोर्ड यांच्यातर्फे जेट्टी उभारण्यात आल्या आहेत. या जेट्टीमुळे दोन्ही भागातील नागरिकांचा प्रवास सुखकर झाला आहे.

असे जरी असले तरी या जेट्टीच्या शेवटच्या दोन्ही टोकावर ६ ते ७ फुटांचा कडा तयार केला आहे. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे टप्पे व पायऱ्या तयार करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे वाढीव , वैतरणा गावातील नागरिकांना आपल्या खासगी बोटीतून प्रवासा दरम्यान पाण्याचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. नुकताच वैतरणा येथील एकाच कुटुंबातील दोन मुली जेट्टीवर फेरफटका मारण्यासाठी गेल्या होत्या. याच दरम्यान त्यांचा तोल जाऊन त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. जर जेट्टीवर डायरेक्ट कड्या ऐवजी जर टप्पे असते तर किमान त्या खोलीचा अंदाज आला असता असे येथील नागरिकांनी सांगितले आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या जेट्टीवर भविष्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी वैतरणा आणि वाढीव ह्या दोन्ही जेट्टीवर टप्पे, पायरी बांधण्यात याव्यात तसेच नागरिकांच्या सोयीसुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या या जेटींचा वापर इतर कामासाठी असलेल्या बोटी देखील करत असल्यामुळे त्या बोटींच्या दबावामुळे जेटीची नासधूस होऊ लागली आहे. येथील पथदिवे ही बंद आहेत.

या सर्व समस्या सोडवण्यात याव्यात अशी डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेतर्फे मेरिटाईम बोर्ड व जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

> **“ वैतरणा जेट्टीवर टप्पे व पायऱ्या न केल्याने पटकन पाण्याच्या खोलीचा अंदाज घेता येत नाही. तर दुसरीकडे जेट्टीची काही भागात नासधूस, बंद असलेले पथदिवे अशा विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. यासाठी जिल्हाधिकारी व मेरिटाइम बोर्ड याबाबत तक्रार केली आहे.**
>
> – सतीश गावड, उपाध्यक्ष डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्था

म. टा. ५.५.१०

# आधी 'नो पार्किंग झोन' आखा!

म. टा. वृत्तसेवा, वसई

## वाहतूक विभागाकडे भाजपची मागणी



वसई-विरारमध्ये पार्किंगची योग्य सोय नसल्याने वाहनधारकांना वाहतूक पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागत आहे. त्यातच शहरातील मुख्य रस्त्यावर अनधिकृत गॅरेज आणि दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे रस्ता अडवणाऱ्यांवर आधी कारवाई करा, तसेच नो पार्किंग झोन जाहीर करा, त्यानंतरच वाहनांवर कारवाई करा, अशी मागणी नागरिकांकडून तसेच भाजपकडून करण्यात येत आहे.

वसई-विरारमधील नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते. शहरात पालिकेची बससेवा अपुरी असल्याने खासगी वाहनांचा वापर अपरिहार्य आहे. मात्र शहरात पार्किंगची सुविधा अपुरी असल्याने रस्त्याकडेला वाहने उभी करण्याशिवाय अन्य पर्याय वाहनधारकांसमोर नसतो. दुसरीकडे अशा रीतीने पार्क केलेल्या वाहनांवर पालिकेकडून तसेच वाहतूक पोलिसांकडून कारवाई होते आणि दंड वसूल केला जातो. त्यामुळे वाहनधारकांची कोंडी होते. त्यामुळे वाहने नेमकी पार्क करायची कुठे, हा प्रश्न सध्या नागरिकांना पडला आहे.

त्यातच पालिकेने अद्याप नो पार्किंग झोन जाहीर केलेले नसल्याने वाहनधारक जिथे जागा मिळेल तेथे वाहने पार्क करतात. त्यामुळे पालिकेने पार्किंगची अधिकृत सोय करण्याआधी शहरात नो पार्किंग झोन तयार करावेत आणि तसे फलकदेखील लावावेत, अशी मागणी करण्यात येत आहे.

दुसरीकडे पेल्हार फाटा ते मिठोळ या मुख्य रस्त्यावर बेकायदा गॅरेज आणि अवैध फेरीवाल्यांचे अतिक्रमण, मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला वर्षानुवर्षे बेकायदा पद्धतीने उभी केलेली वाहने, अवैध रिक्षा थांबे या कारणांमुळे परिसरातील नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

परंतु वाहतुकीच्या समस्या निर्माण करणाऱ्या या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून वाहतूक विभाग केवळ दुचाकी वाहनांवर कारवाई करून प्रत्येकी ५०० रुपये दंड वसूल करत असल्याचा आरोप वसई-विरार भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी केला आहे. त्यामुळे आधी वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या मोठ्या वाहनांवर कारवाई करावी, तसेच 'नो पार्किंग झोन' आखावेत, त्यानंतरच दुचाकी वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी वसई-विरार वाहतूक पोलिस विभागाकडे केली आहे. अन्यथा या विरोधात भाजपच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही बारोट यांनी दिला आहे.

लोकसत्ता ५.५.१०

# आदिवासींच्या मागण्यांसाठी एकता परिषदेचा मोर्चा

लोकसत्ता वार्ताहर



तहसीलदार कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चातील सहभागी आंदोलक आदिवासी

**वसई :** आदिवासी एकता परिषदेतर्फे वसईच्या भागात राहत असलेल्या आदिवासी बांधवांच्या विविध मागण्यांसाठी सोमवारी सकाळी ११ वाजता तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यात शेकडो आदिवासी बांधव सामील झाले होते.

वसईच्या विविध ठिकाणच्या भागात आदिवासी बांधव राहत आहेत. काही बांधवांच्या नावावर स्वत: मालकीची जागा नसल्याने वर्षानुवर्षे शासकीय व गुरचरण जागेवर घरे, झोपड्या उभारून आपल्या आपल्या कुटुंबासह राहत आहेत. परंतु आता शासनाने ही घरे व झोपड्या तोडण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आदिवासी बांधव व शेतमजूर हे बेघर होण्याची शक्यता आहे. यासाठी आदिवासी बांधव आक्रमक झाले असून सोमवारी वसईच्या तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढत आंदोलन करीत तीव्र विरोध दर्शविला आहे.

सरकारी व गुरचरण जागेवरील आदिवासी समाजाच्या झोपड्या (घरे) नियमाकुल करण्यात यावी, तसेच आदिवासी समाजाचे रेशनिंगचे धान्य बंद न करता मासिक धान्य वाढवून देण्यात यावे व आदिवासी समाजाला संविधानाने दिलेल्या हक्क अधिकारांची अंमलबजावणी करण्यात यावी अशा मागण्यासाठी आंदोलन केले.

लोकसत्ता पु.पा.४०

## शेतकऱ्याची फसवणूक करणारा आरोपी अटकेत

**वसई :** शेतकऱ्याची फसवणूक करणाऱ्या आरोपीला माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ४८ तासांत अटक केली आहे. त्यांच्याकडून सुमारे ५४ हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दिवाळीनिमित्त निफाड, नाशिक येथील शेतकरी केशव नामदेव जगताप यांची वसईत एका अज्ञात व्यक्तीने झेंडूची फुले खरेदी करण्याच्या नावाखाली फसवणूक केली होती. या प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात शेतकऱ्याने तक्रार केली होती. माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास सुरू केला होता. मिळालेल्या माहितीच्या आधारे अवघ्या ४८ तासांत शेतकऱ्याची फसवणूक करणाऱ्या आरोपीला नालासोपारा येथून गजाआड करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# सीटबेल्टच्या नियमाबाबत संभ्रम

## पोलिसांची मृदू भूमिका, टॅक्सी चालकांचा विरोध

**अभिषेक तेली, दिशा काते, लोकसत्ता**

**मुंबई :** मुंबईत मंगळवारपासून चारचाकी वाहनधारकांसह सहप्रवाशांना सुद्धा सुरक्षा पट्टा (सीटबेल्ट) लावणे सक्तीचे करण्यात आले आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांना समज देण्यास पोलिसांनी सुरूवात केली असली तरी या नियमाबाबत आणि कारवाईबाबत प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये संभ्रम आहे. पोलिसांकडून ११ नोव्हेंबरपासून नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

या नियमाच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच दिवशी मुंबईतील अनेक वाहनांमध्ये मागे बसलेल्या सहप्रवाशांनी सीटबेल्ट लावलेले दिसले नाही आणि वाहनधारकांनाही या नियमाबाबत पुरेशी माहिती नसल्याचे निदर्शनास आले आहे. अलीकडेच दुचाकीस्वार आणि मागे बसलेल्या व्यक्तीसाठीही हेल्मेट वापरण्याची सक्ती करण्यात आली आहे आणि आता या सीटबेल्टच्या नवा नियम लागू करण्यात आला आहे. मात्र, शहरांतर्गत प्रवासासाठी गरजच काय? मागच्या आसनांवर दोनच पट्टे असतील तर तिसऱ्या माणसाने काय करायचे? असे प्रश्न प्रवाशांनी उपस्थित केला आहे.

### कारवाई चालकावर की प्रवाशावर?



नियमानुसार चालकावर कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र, चालकांनी सांगून प्रवासी ऐकत नसतील तर काय करावे असा प्रश्न उपस्थित करून पट्टा न लावणाऱ्या प्रवाशावर कारवाई करावी असे चालकांचे म्हणणे आहे.

### काटेकोर पालनाची शक्यता कमी

वाहनचालक हे नियमित सीटबेल्ट लावतात आणि पुढे डाव्या बाजूला बसणारे प्रवासी हे विनंती केल्यानंतरच सीटबेल्ट लावतात. त्यामुळे आता मागच्या बाजूला बसणाऱ्या प्रवाशांना सीटबेल्ट लावणे बंधनकारक केल्यानंतर सरकारने कितीही आवाहन केले तरीसुद्धा या नियमाचे काटेकोरपणे पालन होण्याची शक्यता कमी आहे, असे मुंबईत गेल्या ४५ वर्षांपासून टॅक्सी चालविणारे बाबू कासीम शेख यांनी सांगितले. मुंबईतील टॅक्सी प्रवासाचे अंतर हे कमी असते आणि शेअर टॅक्सीच्या प्रवासात प्रत्येक प्रवासी हा वेगवेगळ्या ठिकाणी उतरतो, असे निरीक्षणही त्यांनी नोंदवले.

शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आणि लोकांच्या जीविताला धोका पोहचू नये, यासाठी सर्व नियम केले जातात. काळाच्या ओघात रस्ते चांगले झाल्यामुळे वाहनांची गती वाढली आहे, परिणामी अपघात होण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे सहप्रवाशांनी सुद्धा सीटबेल्ट लावणे गरजेचे आहे. सध्या आम्ही सरसकट कारवाई न करता या नियमाबाबत जनजागृती करत आहोत. प्रत्येकाला जीवाची काळजी असल्यामुळे प्रत्येकजण या नियमाचे पालन करेल अशी मला अपेक्षा आहे., असे मरीन ड्राइव्ह वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक 'संजय देशमुख' यांनी सांगितले.

म. टा. पु. पा. १.

# बेकायदा मार्केट अखेर जमीनदोस्त



म. टा. वृत्तसेवा, वसई

नालासोपारा पूर्वेला रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या अनधिकृत जाधव मार्केटवर सोमवारी तोडक कारवाई करण्यात आली. शनिवारी याच मार्केटमध्ये भीषण आग लागून सहा दुकाने जळून खाक झाली होती. या पार्श्वभूमीवर, पालिकेने या अनधिकृत मार्केटवर कारवाईचा बडगा उगारला असून हे संपूर्ण मार्केटच जमीनदोस्त केले आहे.

नालासोपारा पूर्वेस रेल्वे स्थानकाजवळ जाधव मार्केट उभारण्यात आले होते. हे संपूर्ण मार्केट अनधिकृत आहे. स्टेशनजवळच्या या परिसरात मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. तसेच या अनधिकृत मार्केटमुळे स्थानकात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना अडथळा येतो. या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही यंत्रणा नाही. त्यातच शनिवारी या मार्केटला भीषण आग लागली आणि यात सहा दुकाने जाळून खाक झाली. त्यामुळे या बेकायदा मार्केटमुळे सर्वसामान्यांच्या जीवाला असलेला धोका अधोरेखित झाला.

आगीच्या घटनेनंतर पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी तातडीने निर्णय घेत, संपूर्ण जाधव मार्केटवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त आशीष पाटील आणि उपायुक्त अजित मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करून हे संपूर्ण मार्केट जमीनदोस्त करण्यात आले. सोमवारी पालिकेने केलेल्या कारवाईत येथील जवळपास १८ अनधिकृत दुकाने जेसीबीच्या साह्याने तोडण्यात आली.

## 'बेकायदा बाजारांची माहिती द्या'

पालिका हद्दीतील बेकायदा इमारती आणि टपऱ्यांवर पालिकेची कारवाई सुरूच आहे. मात्र पालिकेने शहरातील अनधिकृत मार्केट, आठवडी बाजार यांचाही शोध घेऊन कारवाई करणे गरजेचे आहे, असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. अशा अनधिकृत बाजारांबाबत पालिकेला माहिती मिळाल्यानंतर किंवा नागरिकांनी पालिकेला माहिती दिल्यानंतर, पालिका तात्काळ त्यावर कारवाई करेल, असे पालिका उपायुक्त अजित मुठे यांनी सांगितले.